**श्री.अजयकुमार नष्टे,उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात...**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/७७/२०२४

दिनांक-२८.०३.२०२५

**प्रति,**

१. सुशिला शिगोंडा पाटील
२. सुमित्रा बसगोंडा बिराजदार
३. शंकुतला सदाशिव पाटील

अ.क्र.१ रा. सत्ती, ता. अथणी, जि. बेळगाव
अ.क्र.२ रा. मुगळखोड, ता. रायबाग, जि. सांगली
अ.क्र.३ रा. हळ्याळ, ता. अथणी, जि. बेळगाव .... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. चनगोंडा बाळाप्पा बिराजदार
२. देवगोंडा ऊर्फ दयगोंडा बाळाप्पा बिराजदार
३. बसगोंडा बाळाप्पा बिराजदार
४. मलगोंडा बाळाप्पा बिराजदार
५. सुनंदा कलगोंडा बिराजदार
६. चेतन कलगोंडा बिराजदार
७. तनुजा ईश्वर पाटील
८. राजकुमार सुरेश अंदानी

अ.क्र. १ रा. हिप्परगी, ता. जमखंडी जि.बागलकोट
अ.क्र. २ रा. मुगळखेड, ता. रायबाग, जि.बेळगांव
अ.क्र. ३ते ६, ८ रा. गुगवाड, ता. जत, जि. सांगली
अ.क्र. ७ रा. सावळज, ता. तासगाव, जि. सांगली ..... **जाबदार**

## महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे

**वाद मिळकतीचा तपशिल**

| गांव | तालुका | गट नंबर | एकूण क्षेत्र | पैकी वादाचे क्षेत्र | वादाबाबतचा फेरफार नंबर |
|---|---|---|---|---|---|
| गुगवाड | जत | १८४ | १० हे ४७ आर<br>पो.ख. ० हे ०८ आर | ० हे १५ आर | ६९८६ |

**निकालपत्र**

मौजे गुगवाड, ता.जत येथील उक्त वाद मिळकती संदर्भात मंडळ अधिकारी, जत यांनी फेरफार नंबर ६९८६ प्रकरणी क्र.तक्रार रजि क्र.२३/२०२३, दिनांक ०२.०२.२०२४ रोजी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये आरटीएस अपील या न्यायालयात दाखल केलेले आहे.

**प्रस्तुत अपीलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी आपले अपील अर्जामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

**१.** वडिलार्जित वाद मिळकतीमध्ये अपेलंट व जाबदार नं. १ ते ७ यांचेमध्ये हिंदू एकत्र कुटुंबातील अविभक्त हिस्सा अद्याप कोणत्याही प्रकारे सरस निरस मानाने वाटप झालेले नसताना, वडिलार्जित

वाद मिळकतीमधील अपेलंट यांचे संमत्ती विना व एकत्र कुटुंबातील वडिलार्जित एकत्र कुटुंबातील मिळकतीमधील अविभक्त हिस्सेबाबत अद्याप सरस निरस मानाने वाटप न करता बेकायदेशीर जाबदार नं. १ यांनी त्यांचे नांवावर असलेल्या ७/१२ अभिलेखावरील आणेवारीचा गैरफायदा घेवून जाबदार नं. ८ यांचे नांवे तथाकथित बेकायदेशीर बोगस विनाकब्जा खरेदीदस्त नं. ४४८८/२०२३ ने दिनांक: २२/०९/२०२३ रोजी र.रु. १,६०,०००/- (अक्षरी एक लाख साठ हजार मात्र) मोबदला घेवून अंशतः भाग खरेदीपत्राने तबदिली केलेबाबत अपेलंट यांना सन २०२३ मध्ये ऑक्टोंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात समजल्यानंतर अपेलंट यांनी जाबदार नं. १ यांनी जाबदार नं. ८ यांचे नांवे दिनांकः २२/०९/२०२३ रोजी वडिलार्जित मिळकतीमधील क्षेत्र वाटप नसताना, तबदिली केलेबाबत ७/१२ अभिलेखावर प्रलंबित फेरफार नं. ६९८६ बाबत निदर्शनास आल्यानंतर संबंधीत मंडल अधिकारी यांचेकडे अपेलंट यांनी तक्रार देणेकरीता गेले असता, मंडल अधिकारी, जत यांनी अपेलंट यांना सदर फेरफार नं. ६९८६ ची नोंद मंजूर केलेबाबत सांगितल्यानंतर अपेलंट यांनी मंडल अधिकारी, जत यांचेकडील त.र.नं. २३/२०२३, दिनांक: ०२/०२/२०२४ रोजीच्या आदेशामधील फेरफार नं. ६९८६ च्या मंजूर नोंदीवर नाराज होवून अपेलंट यांनी प्रस्तुत अपील या कोर्टात दाखल केलेले आहे. तरी अपेलंट यांचे अपील मंजुर करणेत यावे अशी विनंती अपिलार्थी यांनी केली आहे.

**जाबदार यांनी आपले लेखी युक्तिवादामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. अपेलंट हे जाबदार नं. १ यांनी जाबदार नं. ८ यांना मौजे गुगवाड येथील वडिलार्जित गट नं. १८४ मधील ० हे १५ आर आकार रु. ०.५ ची मिळकत दि. २२/०९/२०२३ रोजी रक्कम रु. १,६०,०००/- मोबदला देवून नोंदणीकृत खरेदी खत नं. ४४८८/२०२३ ने खरेदी पत्र करुन दिलेले होते. सदर खरेदी पत्राची नोंद फेरफार नं. ६९८६ अन्वये तर नं. २३/२०२३ दि. ०२/०२/२०२४ रोजी मंडळ अधिकारीसो, जत यांचेकडील आदेशानुसार फेरफार नं. ६९८६ ची नोंद मंजूर केलेल्या आदेशावरुन नाराज होवून अपिल दाखल केलेले आहे.

२. सदर अपेलंट व जाबदार नं. ८ यांचेमध्ये गाव पातळीवर तडजोड होवून जाबदार नं. ८ यांनी नोंदणीकृत खरेदी पत्र नं. ४४८८/२०२३ अन्वये घेतलेले खरेदी पत्रामधील मिळकत ० हे १० आर पुन्हा तडजोड होवून जाबदार नं. १ चनगोंडा बाळाप्पा बिरादार यांनी श्रीशैल देवगोंड बिरादार यांना नोंदणीकृत खरेदी दस्त क्र. ४९५८/२०२४ अन्वये दि. ०२/०९/२०२४ रोजी खरेदी पत्र करुन दिलेले आहे. सदर खरेदी पत्रामध्ये जाबदार नं. ८ यांनी समत्ती / मान्यता देणार म्हणून सह्या केलेल्या आहेत. सदर खरेदी पत्राची नोंद फेर फार नं. ७२३७ अन्वये दि. ३०/०९/२०२४ रोजी मंजूर होवून ७/१२ अभिलेखावर श्रीशैल देवगोंडा बिरादार यांचे नाव नोंद झालेले आहे.

३. जाबदार नं. १ यांनी जाबदार नं. ८ यांचे नांवे दि. २२/०९/२०२३ रोजी करुन दिलेले खरेदी पत्राची नोंद फेरफार नं. ६९८६ अन्वये मंजूर झालेले फेरफार अपेलंट यांच्या मागणी प्रमाणे अपिल मान्य करुन फेरफार नं. ६९८६ नोंद रद्द करणेस जाबदार नं. ८ यांची कोणत्याही प्रकारे तक्रार व हरकत नाही. सदर जाबदार नं. १ व ८ यांचेमध्ये झालेले खरेदी पत्र मे. दिवाणी न्यायालयात रे.दि.मु. नं. ४९/२४ च्या दाव्यामध्ये रद्द करुन घेणेचे आहे. सदर दाव्यामध्ये देखील जाबदार नं. ८ यांनी त्यांच्या नांवावर घेतलेले खरेदी पत्र रद्द करुन घेणेस व तडजोडीच्या वेळी समत्ती देणार आहे.

४. तरी अपेलंट यांनी दाखल केलेल्या अपिलामधील मंडळअधिकारी जत यांनी फेरफार नं.६९८६ अन्वये दि. ०२/०२/२०२४ रोजी मंजूर केलेला आदेश रद्द करणेस जाबदार नं. ८ यांची तक्रार व हरकत नाही. सदर तडजोडीप्रमाणे अपेलंट यांचा अपिल मंजूर करुन फेरफार नं. ६९८६ ची नोंद नामंजूर करणेत यावी.

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपील मेमो, अपिलार्थी व जाबदार यांचा दिनांक०६.०२.२०२५ रोजीचा तडजोडनामा,प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे यांचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे गुगवाड, ता.जत येथील उक्त वाद मिळकती संदर्भात मंडळ अधिकारी, जत यांनी फेरफार नंबर ६९८६ प्रकरणी क्र.तक्रार रंजि क्र.२३/२०२३, दिनांक ०२.०२.२०२४ रोजी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये आरटीएस अपील या न्यायालयात दाखल केलेले आहे.

२. वाद मिळकतीच्या संदर्भात अपिलार्थी व जाबदार नं. ८ यांचेमध्ये गाव पातळीवर तडजोड होवून जाबदार नं. ८ यांनी नोंदणीकृत खरेदी पत्र नं. ४४८८/२०२३ अन्वये घेतलेले खरेदी पत्रामधील मिळकत ० हे १० आर पुन्हा तडजोड होवून जाबदार नं. १ चनगोंडा बाळाप्पा बिरादार यांनी श्रीशैल देवगोंड बिरादार यांना नोंदणीकृत खरेदी दस्त क्र. ४९५८/२०२४ अन्वये दि. ०२/०९/२०२४ रोजी खरेदी पत्र करुन दिलेले आहे. सदर खरेदी पत्रामध्ये जाबदार नं. ८ यांनी समंत्ती / मान्यता देणार म्हणून सहया केलेल्या आहेत. सदर खरेदी पत्राची नोंद फेरफार नं. ७२३७ अन्वये दि. ३०/०९/२०२४ रोजी मंजूर होवून ७/१२ अभिलेखावर श्रीशैल देवगोंडा बिरादार यांचे नाव नोंद झालेले आहे.

३. तसेच वाद मिळकती संदर्भात अपिलार्थी यांच्या मागणी प्रमाणे अपिल मान्य करुन फेरफार नं. ६९८६ नोंद रद्द करणेस जाबदार नं. ८ यांची कोणत्याही प्रकारे तक्रार व हरकत नाही असा युक्तिवाद सादर केलेला आहे.

४. त्यामुळे वरील सर्व उपरोक्त वस्तुस्थीती व दाखल कागदपत्रे यांचा एकत्रीत अवलोकन करता अपिलार्थी यांचे अपिल मान्य करणे आवश्यक आहे असे माझे मत झालेने मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

**निकालपत्रात नमूद कारणास्तव अपिलार्थीचा अपील अर्ज मान्य करणेत येत आहे. मंडळ अधिकारी जत, यांचा क्र.तक्रार रजि क्र.२३/२०२३, दिनांक ०२.०२.२०२४ चा आदेश रद्द करणेत येवून मौजे गुगवाड ता.जत येथील फेरफार क्रमांक ६९८६ ची नोंद रद्द करणेत येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर निकालाची समज सर्व संबंधिताना देणेत यावी.

सदर आदेशाचा अंमल अपिल कालावधिनंतर करणेत यावा.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

(अजयकुमार नष्टे)
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण - जत
दिनांक -२८.०३.२०२५

प्रत - तहसिलदार जत यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.